# बुलडाणा जिल्हा परिषद,बुलडाणा
## १३वा वित्त आयोग

केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार पंचायत राज संस्थाच्या बळकटीकरणासाठी १३ वा वित्त आयोगाच्या जनरल बेसीक ग्रॅट व जनरल परफॉर्मन्स ग्रॅटच्या स्वरुपात सन २०१०-२०११ पासुन निधी प्राप्त होत आहे. शासन निर्णय क्रंमाक तेविआ/२०१०/प्र.क्र२२/वित्त ४ दिनांक ३०.८.२०१० अन्वये दिलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार निधी वाटप करण्यात येत आहे.

१३ वा वित्त आयोगाचा निधी जिल्हातील पंचायत राज संस्थासाठी (जि.प./पं.स./ग्रा.प.) साठी अनुक्रमे खालीलप्रमाणे वाटप करण्यात येत आहे.

| स्तर | निधी वाटपाचे प्रमाणे |
|---|---|
| १) जिल्हा परिषद स्तर | १० टक्के |
| २) पंचायत समिती स्तर | २० टक्के |
| ३) ग्रामपंचायत स्तर | ७० टक्के |

**<u>१३ वा वित्त आयोग</u>**

**<u>जिल्हा परिषद स्तरावर करावयाच्या बाबी :-</u>**

- जि.प.अंतर्गत येणाऱ्या इतर जिल्हा मार्गाची ( Other District Roads ) देखभाल दुरुस्ती व बांधकाम सदर कामे करतांना शासनाने विहित केलेल्या नामांकाचे तंतोतंत पालन करावे. एकाच वेगवेगळ्या योजनांच्या निधीतून एकाच वेळी हाती घेण्यात येणार नाही व निधीचा अपव्यय/दुरुपयोग होणार नाही याची खबरदारी घ्यावी.
- राज्य निधीतून ब वर्ग दर्जाचा ज्या तिर्थक्षेत्रांना बांधकाम निधी दिला आहे त्या ब वर्ग दर्जाच्या तिर्थक्षेत्रांची देखभाल व दुरुस्ती करणे.
- जि.प. क्षेत्रांतर्गत निर्माण झालेल्या विविध मत्तांची (Assets) देखभाल व दुरुस्ती करणे.
- ग्रामपंचायत कार्यालय/ग्रामसचिवालय बांधकाम तसेच त्यांची देखभाल व दुरुस्ती ( या कामासाठी ग्रामपंचायतींना निधी कमी पडत असल्यास जि. प. स्तरावरील निधी उपलब्ध करुन देता येईल. मात्र एकाच गावात एकापेक्षा जास्त ग्रामपंचायत भवन निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.)
- दहनभूती / दफनभूमीची देखभाल व दुरुस्ती.

- आरोग्य व घनकचरा व्यवस्थापनाची निगडीत कामे ( उदा. पोर्टेबल व व्हेईकल माऊंटेड फॉगिग मशिन, घंटागाडी, टॅक्टर ट्रॉली )
- घनकचरा प्रक्रीयेसाठी (Solid Waste Management) पर्यावरण संतुलित तंत्रज्ञान वापरुन शास्त्रीय पध्दतीने कमी खर्चाचे प्रकल्प हाती घेणे.
- पर्यावरण संतुलित समृध्द ग्राम योजनेसंबंधी ग्रामविकास विकास विभागाने निर्गमित केलेल्या दिनांक १८ ऑगष्ट २०१० च्या शासन निर्णयात अंतभूत असलेल्या विविध बाबी साठी पुरक निधी म्हणून निधीचा वापर करणे.

## <u>पंचायत समिती स्तरावर करावयाच्या बाबी</u>

- पंचायत समिती क्षेत्राअंतर्गत गावांना जोडणाऱ्या रस्त्यांचे ( ग्रामिण रस्ते Village Roads ) बांधकाम, देखभाल व दुरुस्ती. सदर कामे करतांना शासनाने विहित केलेल्या मानंकाचे तंतोतंत पालन करावे. एकच काम वेगवेगळ्या योजनांच्या निधीतून एकाच वेळी हाती घेण्यात येणार नाही व निधीचा अपव्यय/दुरुपयोग होणार नाही याचीही खबरदारी घ्यावी.
- जिल्हा नियोजन मंडळाने ( DPC) ज्या क वर्ग तिर्थक्षेत्रांना बांधकाम निधी दिला आहे त्या क वर्ग दर्जाच्या तिर्थक्षेत्रांची देखभाल व दुरुस्ती करणे.
- पंचायत समिती क्षेत्रा अंतर्गत निर्माण झालेल्या विविध मत्तांची ( Assats ) देखभाल व दुरुस्ती .
- ग्रामपंचायत कार्यालय/ग्रामसचिवालय बांधकाम तसेच त्यांची देखभाल व दुरुस्ती ( या कामासाठी ग्रामपंचायतींना निधी कमी पडत असल्यास पंचायत समिती. स्तरावरील निधी उपलब्ध करुन देता येईल. मात्र एकाच गावात एकापेक्षा जास्त ग्रामपंचायत भवन निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.)
- दहनभूती / दफनभूमीची देखभाल व दुरुस्ती.
- आरोग्य व घनकचरा व्यवस्थापनाची निगडीत कामे ( उदा. पोर्टेबल व व्हेईकल माऊंटेड फॉगिग मशिन, घंटागाडी, टॅक्टर ट्रॉली )
- घनकचरा प्रक्रीयेसाठी (Solid Waste Management) पर्यावरण संतुलित तंत्रज्ञान वापरुन शास्त्रीय पध्दतीने कमी खर्चाचे प्रकल्प हाती घेणे.

- पर्यावरण संतुलित समृध्द ग्राम योजनेसंबंधी ग्रामविकास विकास विभागाने निर्गमित केलेल्या दिनांक १८ ऑगष्ट २०१० च्या शासन निर्णयात अंतभूत असलेल्या विविध बाबी साठी पुरक निधी म्हणून निधीचा वापर करणे.

## <u>ग्रामपंचायत स्तरावर करावयाच्या बाबी.</u>

- ग्रामपंचायत क्षेत्राअंतर्गत निर्माण झालेल्या विविध मत्तांची ( Assats ) देखभाल व दुरुस्ती
- गावातर्गत गटारे व गावाअंतर्गत रस्ते बांधकाम (मुरमीकरणे, खडीकरण, डांबरीकरण व सिमेंट कॉक्रीटीकरण) तसेच त्यांची देखभाल व दुरुस्ती करणे. सदर कामे करतांना शासनाने विहित केलेल्या नामांकाचे तंतोतंत पालन करावे. एकाच वेगवेगळ्या योजनांच्या निधीतून एकाच वेळी हाती घेण्यात येणार नाही व निधीचा अपव्यय/दुरुपयोग होणार नाही याची खबरदारी घ्यावी.
- ग्रामपंचायत कार्यालय/ग्रामसचिवालय बांधकाम तसेच त्यांची देखभाल व दुरुस्ती ( या कामासाठी ग्रामपंचायतींना निधी कमी पडत असल्यास पंचायत समिती स्तरावरील निधी उपलब्ध करुन देता येईल. मात्र एकाच गावात एकापेक्षा जास्त ग्रामपंचायत भवन निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.)
- दहनभूती / दफनभूमीची देखभाल व दुरुस्ती.
- आरोग्य व घनकचरा व्यवस्थापनाची निगडीत कामे (उदा. पोर्टेबल व व्हेईकल माऊंटेड फॉगिग मशिन, घंटागाडी, टॅक्टर ट्रॉली )
- घनकचरा प्रक्रीयेसाठी (Solid Waste Management) पर्यावरण संतुलित तंत्रज्ञान वापरुन शास्त्रीय पध्दतीने कमी खर्चाचे प्रकल्प हाती घेणे.
- पर्यावरण संतुलित समृध्द ग्रामयोजनेसंबंधी ग्रामविकास विकास विभागाने निर्गमित केलेल्या दिनांक १८ ऑगष्ट २०१० च्या शासन निर्णयात अंतभूत असलेल्या विविध बाबी साठी पुरक निधी म्हणून निधीचा वापर करणे.
- ग्रामसभा व ग्रामपंचायत सभा यांच्या दृकश्राव्य चित्रिकरणाची ( Video/Audio Recording ) व्यवस्था करण्यासाठी आवश्यक उपकरणे / साधने घेणे व त्यासाठी आवश्यक तंत्रबळ उपलब्ध करुन घेणे.